Io

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** इंदापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**10/04/2026 00:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 08/04/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 09/04/2026

**Time From (वेळेपासून):** 16:17 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 11:37 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 09/04/2026 **Time (वेळ):** 23:53 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 061

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/04/2026 23:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** **Beat No. (बिट क्र.):**

दक्षिण, 19 किमी

(b) **Address (पत्ता):** पंधारवाडी, ता इंदापुर,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्धीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

इंदापूर पोलीस स्टेशन ★ पुणे ग्रामीण ★

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अविनाश बाबासाहेब घरबुडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860667770

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाना चंद्रकांत बोराटे | | | 1. पधारवाडी, ता इंदापुर,,इंदापूर, पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

तारीख 09/04/2026

फिर्याद

मी अविनाश बाबासाहेब घरबुडे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 9860667770

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 07/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे कर्तव्यावर हजर असताना प्रशासन अधिकारी श्री दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री. विक्रम किसनराव भगत, वय 34 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मु पो पंधारवाडी, ता इंदापुर, जि पुणे. मोबाईल नं 9860504098, यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. तक्रारदार यांना आम्ही त्यांचे वर नमुद मोबाईलवर संपर्क करुन आम्ही उदया दिनाक 08/04/2026 रोजी 11.00 वा चे सुमारास इंदापुर, बायपास येथे◌ सुरक्षित ठिकाणी भेटुन पुढील कारवाई करु उदया तुम्ही तेथे या असे सांगितले. त्यानंतर श्री दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता पुणे महानगरपालीकेचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. सदर विभागाशी आम्ही संपर्क करुन पंच म्हणुन 1) श्री. संदिप सुधाकर दिपके, वय 39 वर्षे, पद-कनिष्ठ अभिंयता, पाणी पुरवठा विभाग,पुणे महानगर पालीका पुणे, पंच 2) राजन जगन्नाथ पास्ते, कनिष्ठ अभिंयता, परिमंडळ,4टिळकरोड पुणे महानगरपालीका, हे उपलब्ध झाले. त्यांना दिनाक 08/04/2026 रोजी सकाळी 07.00 ला प्र वि कार्यालय, पुणे येथे हजर होण्याच्या सुचना दिल्या. तसेच सदर कारवाई करीता आम्हास पोशि/95 रवि दिवेकर, पोशि/7364, भुषण ठाकुर, आणि चालक स फौ अविनाश चव्हाण व शासकीय वाहन इरटिगा गाडी क्र. एमएच 12 युसी 4109 असे पथक उपलब्ध करुन दिले. सर्वांना योग्य त्या सुचना दिल्या.दिंनाक 08/04/2026 रोजी 07.30 वा. चे दरम्यान आम्ही व सापळा पथक, ला प्र वि कार्यालय, पुणे येथे हजर झालो. 07.30 वा. चे दरम्यान मी, पंच व सापळा पथक अंमलदार पोशि/95 रवि दिवेकर, पोशि/7364 भुषण ठाकुर, आणि चालक स फौ अविनाश चव्हाण व शासकीय वाहन इरटिगा गाडी क्र. एमएच 12 युसी 4109 ने ला प्र वि कार्यालय, पुणे येथुन साधुवासवानी चौक-हडपसर मार्गे -पुणे - सोलापुर रोड - यवत- भिगवण येथुन इंदापुर येथिल मेन रोडच्या एस बी पाटील, कॉलेज, इंदापुर , पुणे येथिल शेजारी असलेल्या सुरक्षित ठीकाणी पोहचलो तेथे 11.10 वा. चे सुमारास एक इसम त्यांचे दुचाकी हौंडा शाईन एम एच 42 ए व्ही 9909 वाहनावरुन आले. त्यावेळी आम्ही त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव विक्रम किसनराव भगत, वय 34 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मु पो पधांरवाडी, ता इंदापुर, जि पुणे. असे सांगीतले. त्यानंतर मी , पंचांची तक्रारदार व पथकासोबत एकमेकांची ओळख करुन दिली. तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुशंगाने नमुद कारवाईकरीता पंच क्रं 1 म्हणुन श्री. संदिप सुधाकर दिपके व पंच 2 म्हणुन राजन जगन्नाथ पास्ते हे काम पाहतील असे ठरविण्यात आले. त्यानंतर पुढील कारवाई हि कोणासही संशय येऊ नये म्हणुन इंदापुर , पुणे येथिल एस बी पाटील कॉलेज च्या जवळ असलेल्या मोकळ्या जागेमधुनच करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर मी तक्रारदार यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतले असता तक्रार श्री विक्रम किसन भगत यांनी कथन केली ती खालीलप्रमाणे."वरिल विषयान्वये विंनतीपुर्वक सादर करतो की, मी वरिलप्रमाणे असुन माझ्या नावे माझ्या नावे पंधरवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे येथे गट नं 173-2, मध्ये 1.26 हेक्टर डाळींब शेती आहे. या शेतीवरती दरवर्षी मी पिंककज घेत असतो. सन 2025 चे रक्कम 2,76,000/- रुपयांचे घेतलेले पीक कर्ज मी दि. 24/03/2026 रोजी मी परतफेड केले. यानंतर पुन्हा नविन पिंककज मिळण्यसाठी वरील जमिनीचा 7/12 उतारा मी जय भवानी विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. पंधारवाडी येथील सचिव नानासो बोराटे यांनी दिला. नविन कर्जाच्या चौकशीसाठी मी दि.07/04/2026 रोजी सचिव नानासो बोराटे यांना मी फोन केला असता, मला त्यांनी मला पी डी सी सी बँकेत बोलावणे केले. त्यानंतर मी दि. 07/04/2026 रोजी नानासो बोराटे यांना बँकेत भेटण्यासाठी

माझ्या पिडीसीसी बँक खाते क्रं
गेलो असता, मला बँकेचे बाहेर बोलावुन त्यांनी माझी पीक कर्ज रक्कम जमा केले असुन, माझे पिककज नविन-जुने करुन
297001700000487 यावर रक्कम 2,76,000/- रुपये देतो असे म्हणुन निघुन आलो. त्यांनी मागणी केलेले
दिले म्हणुन 2000/- रुपयांची मागणी केली. त्यावर मी नंतर असुन सदर लाच रक्कम देण्याची माझी
रक्कम हि कोणतीही शासकीय फि नसुन लाच रक्कम आहे अशी माझी खात्री किंवा आर्थिक देवाण घेवाण नाही. तरी
इच्छा नाही. तसेच सचिव नानासो बोराटे यांचे सोबत माझे कोणतेही वाद सचिव नानासो बोराटे यांच्या विरुध्द
भवानी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. पंधारवाडी येथील वगैरे मजकुराची तक्रार लिहून दिली नंतर
आपल्या विभागामार्फत त्यांचेवर कारवाई करावी हि विंनती आहे. " तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार
सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. भगत यांचेकडे विचारणा केली असता,
अर्जासंबधीत असलेल्या लोकसेवकांकडे पडताळणी बाबत तक्रारदार श्री. यावावत फोन वरुन खात्री करुन
आलोसे हे कार्यालयात नियमित उपस्थित नसतात त्यामुळे ते कुठे आहेत यांचे मोबाईल क्रमांक
पडताळणी कारवाईकरता येईल असे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री बोराटे
9423250857 वर तक्रारदार यांचे 9860504098 या मोबाईल क्रमांकावरुन संपर्क करुन आलोसे यांना कुठे
भेटायचे हे विचारुन तेथे तक्रारदार यांना पाठवुन लोकसेवक श्री नानासो बोराटे यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची
मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी, तक्रारदार व पंचास
शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. आणि माझेकडील एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे
वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी.
कार्ड त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32 GB Micro SD HC I असे व मागील बाजुस 5433
DXCXJ0RZ BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस
रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री विक्रम भगत यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये
कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच तक्रारदार, पंच यांचे निवेदन
घेतेवेळी पो शि ठाकुर हे शासकीय कॅमेरा मध्ये चित्रिकरण करतील अशा सुचना दिल्या. त्याप्रमाणे एक नविन मायक्रो
एस.डी.कार्डचे सिंलबद पॅकिंग उघडुन पंचांना दाखविले असता ते ईव्हीएम कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.
डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजुस EVM Elite 32 GB Micro SD HC I मागील बाजुस
EETF32GMR08250032F5A55 W2517044242Mअसे असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड
शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये इन्सर्ट करण्यात आले. त्यानंतर माझे सुचनेवरुन पो शि क्र 95/दिवेकर यांनी व्हाईस
रेकॉर्डर चालु करुन प्रथम तक्रारदार, व नंतर पंचाचे सापळापुर्व पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 12.26
वा. होती त्याच वेळेस पो शि क्र 7364/ठाकुर यांनी निवेदनावेळेचे चित्रिकरण केले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस
रेकॉर्डर बंद करून माझे ताब्यात ठेवला. आणि तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास सापळापुर्व पडताळणी
कारवाई अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु 12.36 वा लोकसेवक श्री बोराटे यांचे
मोबाईल क्रमांक 9423250857 वर तक्रारदार यांचे 9860504098 या मोबाईल क्रमांकावरुन संपर्क करुन
तक्रारदार यांचा मोबाईल स्पीकरवर टाकला असता आलोसे यांचेशी संपर्क झाला व त्यांनी सागितले की मी बाहेर
आलो असुन, आल्यावर कॉल करतो. सदरचे संभाषण व्हाईस रेकॉर्डवर रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर काही वेळ
वाट पाहुन आलोसे यांचा फोन न आल्याने 14.27 वा सुमारास पुन्हा व्हाईस रेकॉडर चालु करुन तक्रारदार यांचा
फोन स्पीकरवर टाकुन आलोसे बोराटे यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क केला असता आलोसे यांचेशी संपर्क होउ
शकला नाही. 14.36 वा चे दरम्यान आलोसे नानासो बोराटे यांचा त्यांचे मोबाईल क्रमांक 9423250857 वरुन
तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक 9860504098 फोन आला त्यामध्ये आलोसे श्री बोराटे यांनी तक्रारदार यांना पी
डी सी सी बँक, इंदापुर शाखा, पुणे येथे भेटण्यास बोलावले.
त्यानंतर माझे सुचनेनुसार पोशि दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टचे
आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. भगत व पंच क्र. 1 श्री. दिपके
यांना तक्रारदार यांनी आणलेल्या दुचाकी होंडा शाईन एम एच 42 ए व्ही 9909 वरुन लोकसेवकश्री बोरोटे यांची
भेट घेण्याकरीता पी डी सी सी बँक, इंदापुर शाखा, पुणे येथे रवाना केले. ती वेळ 14:49 वा. होती. आम्ही उर्वरित
पडताळणी कारवाई पथक शासकीय वाहनामध्ये बसुन सदर ठिकाणी थांबून राहीलो. त्यानंतर साधारणपणे 15:09
वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. भगत व पंच क्र. 1 श्री. संदिप दिपके हे पथक थांबलेल्या ठिकाणी तक्रारदार
यांचेकडील दुचाकी वाहनाने आले तेव्हा पोशि दिवेकर यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून,
तो बंद केला. त्यानंतर तक्रारदार यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता,
त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, "मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेवक श्री बोराटे यांचे भेट घेणे करीता पी डी सी
सी बँक, ता इंदापुर जि पुणे येथे गेलो तेव्हा लोकसवक श्री नानासो बोराटे तेथे हजर होते. त्यांचेसमोर

र्यालयातील काही इसम चर्चा करीत होते मी पंचांना इशारा करुन सदर इसम हेच लोकसेवक श्री नानासो बोराटे, चिव- जय भवानी वि का सेवा सह सो सा लि पंधारवाडी, ता इंदापुर, जि पुणे असल्याचे सागितले. त्यांनी मला हुन मागे येण्याचा इशारा केला. आम्ही जिण्याने खाली उतरुन पी डी सी सी बँकेच्या, आवारात बाजुला त्यांचे ागे आलो. तेव्हा ते मला म्हणाले की "आज आलती कॅश तिथ, काढली का म". त्यावर मी त्यांना असे म्हणालो की "नाय अजुन काढायची य". त्यावेळी मी त्यांना " कस " असे म्हणालो तेव्हा श्री नानासो बोराटे मला म्हणाले की "काय दयायचे ते दयायचे, तुला माहीत नाय होय " असे म्हणाले. आमचेमध्ये कामासंदर्भात चर्चा सुरु असताना आलोसे मला म्हणाले की "हजार, पाचशे काय जे, असल्याल तेवढे दे" असे म्हणुन माझ्याकडे एक हजार रुपयांची लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच दिपके हे पी डी सी सी बँकेच्या आवारातुन बाहेर निघुन माझ्या दुचाकी वाहनावरुन पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर मी पंच क्रं 1 दिपके यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिति विचारली असता, त्यांनीही तक्रारदार यांनी सांगीतलेप्रमाणेच हकिकत सांगीतली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्डकरुन पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली.सदर पडताळणी कारवाईवरुन लोकसेवक श्री नाना चंद्रकांत बोराटे,जय भवानी वि का सेवा सह सो सा लि पंधारवाडी, मु पो पंधारवाडी, ता इंदापुर, जि पुणे यांनी तक्रारदार विक्रम भगत यांना त्याचे शेत जमिनीच्या कर्जाचे वाटप केल्याचा मोबदला म्हणुन म्हणुन तडजोडी अंती 1,000/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर तक्रारदार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली असता त्यांनी 500 रुपये दराच्या 2 नोटा काढुन स्वकमाई चे असुन सदर रक्कम सापळा कारवाई करीता वापरण्याचे ठरवले त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

दाखल अधिकारी - पोसइ गावडे सो ा

तपासी अधिकारी-श्रीमती पो.नि.शैलजा शिंदे -अँटी करप्शन ब्युरो ,पुणे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री. भगत व पंच क्रमांक -1 श्री. संदिप दिपके व पंच क्रमांक - 2 राजन पासते यांचे निवेदन 15:57 वा घेण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. सदर निवेदनाचे चित्रिकरण करण्यात आले. तक्रारदार श्री. भगत यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 1,000/- रु. रक्कम पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 2 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,000/- रु. असलेचे दिसुन आले. तक्रारदार श्री.भगत यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500/- रुपयांचे नोटांचे नंबर एका को¬-या कागदावर लिहुन घेतले त्यावर मी व पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर स फौ अविनाश चव्हाण यांनी शासकीय वाहनात पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च) व अँथ्रासिन पावडर दाखवून कारवाईतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. तक्रारदार यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावली. अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार श्री विक्रम भगते यांचे शर्टचे समोरील बाजुच्या डाव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना ताब्यात घेतेवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉर्डींग करणेत येणार असल्याची माहिती पथकास देवून ती पो शि दिवेकर यांचे ताब्यात देवुन त्यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंचाना व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन लोकसेवक श्री बोराटे यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यालयाचे बाहेर आवारात येवुन लाच स्वीकारलेबाबतचा इशारा करणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. सापळा पथकातील टीम मधिल सर्वांना काम समजावुन सुचना देण्यात आल्या. त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर मशिन सुरू करून ते ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे बनीयानचे आतुन लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री संदिप दिपके यांना लोकसेवक श्री नानासो बोराटे यांना भेटण्यासाठी पी डी सी सी बँक, ता इंदापुर, जि पुणे येथे जाण्याकरीता तक्रारदार यांचे कडील मोटार सायकल वरुन रवाना केले. त्याचे मागुन मी व सापळा पथक , पंच क्रमांक दोन यांचे सह सरकारी वाहनाने सापळा कारवाई करीता शासकीय वाहना मागोमाग पी डी सी सी बँक, ता इंदापुर, जि पुणे च्या दिशेने 16.17 वा रवाना झालो.पी डी सी सी बँक, ता इंदापुर, जि पुणे कार्यालयाच्या परिसरामध्ये पोहचुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबलो असता तक्रारदार यांनी पी डी सी सी बँक, इंदापुर, कार्यालयाच्या बाहेर त्यांचे दुचाकी वाहन पार्क करुन तक्रारदार व पंच क्रं 1 हे पी डी सी सी बँकेच्या कार्यालयाच्या आवारात गेले. काहि वेळात पी डी सी सी बँकेच्या आवारातुन तक्रारदार, पंच 1 बाहेर आले. व तक्रारदार यांनी लाच स्वीकारले बाबत कोणताही इशारा न करता पुन्हा सापळा पथक सकाळी थांबलेल्या ठीकाणी येवुन थांबले त्याचे मागे मी व सापळा पथक देखिल सदर ठीकाणी आलो. त्यावेळी तक्रारदार यांचे कडील व्हाईस रेकॉर्डर माझे सुचनेवरुन पोशि दिवेकर यांनी बंद केला. ती वेळ 16.40 वा ची होती. आम्ही तक्रारदार श्री भगत यांना रवाना केल्यापासून ते परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितले की, त्यानंतर मी तक्रारदार भगत यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत पंचांसमक्ष विचारणा

केली असता त्यांनी सांगीतले की, मी व पंच 1 दिपके असे माझ्या दुचाकी वाहनावरुन पिडीसीसी बँक, इंदापुर येथे गेलो. तेथे गेल्यानंतर मी माझ्या मोबाईलवरुन सचिव बोराटे साहेब यांचे मोबाईलवर फोन करुन माझ्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी त्यांनी माझा फोन रिसीव्ह केला असता मी त्यांना "आलोय की बँकेच्या बाहेर" असे म्हणालो. त्यावेळी आलोसे बोराटे मला "घरी आलो आता मी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आता कस करु" अशी विचारणा केली असता आलोसे बोराटे मला "आता उदया सकाळी गाठं पडलं" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "बर ठिकए" असे म्हणुन फोन कट केला. व दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच 01 दिपके यांना सोबत घेऊन एस बी पाटील महाविदयालया शेजारील पटांगणामध्ये आलो. अशी हकिकत पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर पंच क्र.01 श्री.दिपके यांना गेले पासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्र.01 श्री.दिपके यांनी तक्रारदार यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकत प्रमाणे खरी असलेबाबतची खात्री झाली. त्यानंतर तक्रारदार श्री.भगत यांचेकडे लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे शर्टच्या खिशातील लाच रक्कम दाखविली असता सदर रक्कम पंचासमक्ष एका लिफाफामध्ये टाकुन ती आमच्याकडे सुरक्षित ठेवण्यात आली. तक्रारदार यांना त्यांनी दिलेल्या लाचेच्या तक्रारीबाबत कोठेही वाच्यता न करणेबाबतची सुचना देवून व गोपनीयता राखणेबाबत पंच व सापळा पथकास तशा सुचना देण्यात आल्या. त्यानंतर सर्वानुमते सापळा कारवाई स्थगित करण्याचे ठरविले.त्यानंतर सदर ठिकाणी पुढील कारवाईसाठी जागा उपलब्ध नसल्याने सर्वानुमते लाप्रवि कार्यालय, पुणे येथे पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. दि. 09/04/2026 रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले होते. त्या प्रमाणे मी, सापळा पथक, पंच सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेले तसेच तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुशंगाने केलेल्या कारवाईचे सर्व साहित्य घेऊन शासकीय वाहन ईर्टीगा क्रं एमएच – 12 - युसी - 4109 यामधुन लाप्रवि, पुणे कार्यालयामधुन 07.15 वा. चे सुमारास बाहेर निघुन हडपसर - उरुळी कांचन – चौफुला – कुरकुंभ – भिगवण मार्गे इंदापुर येथील एस बी पाटील कॉलेजजवळील मोकळ्या पटांगणात पोहोचलो ती वेळ 10.30 वा ची होती. त्यानंतर काहि वेळात सदर ठिकाणी तक्रारदार भगत हे त्यांचे दुचाकी वाहनावरुन हजर झाले ती वेळ 11.05 वा. ची होती. त्यावेळी मी तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसण्याची सुचना दिली तेव्हा तक्रारदार हे शासकीय वाहनात येऊन बसले. त्यानंतर मी पंचांना, तक्रारदार व पथकास तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुशंगाने झाले कारवाईबाबत थोडक्यात माहिती दिली. व सापळा कारवाई चे अनुषंगाने घेण्यात येणारे तक्रारदार व पंचाचे निवेदणांचे व सापळा कारवाई दरम्यानचे व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यावेळी तक्रारदार भगत यांनी आम्हा दोन्ही पंचांसमक्ष मी यांना सांगीतले की, सचिव बोराटे साहेब हे त्यांचे कार्यालयात नेहमी उपस्थित नसतात. काहिवेळेत ते इंदापुर येथील पीडीसीसी बँकेच्या मुख्य शाखेमध्ये आलेले असतात. त्यामुळे ते कुठे आहे याबाबत त्यांना फोन करुन विचारणा केल्यानंतर त्यांची भेट घेता येईल असे सांगीतल्याने मी सचिव बोराटे यांना फोन करुन कुठे आहेत याबाबत विचारणा करीता तक्रारदार भगत हे त्यांचा मो.क्रं. 9860504098 यावरुन सचिव बोराटे यांचा मो.क्रं. 9423250857 यावर फोन करुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचेसमोर धरला. सचिव बोराटे यांनी तक्रारदार यांचा कॉल रिसीव्ह केला असता. तक्रारदार हे सचिव बोराटे यांना "कुठंय नानासाहेब" अशी विचारणा केली असता सचिव बोराटे हे तक्रारदार यांना "ऑफिसला ये थोडयावेळात" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे सचिव बोराटे यांना "चालतय म आलो." असे म्हणुन फोन कट केला. त्यावेळी पोशि दिवेकर यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 11.37 वा ची होती. सदरचा फोन कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आला. एकंदरीत तक्रारदार यांनी सचिव बोराटे यांचेसोबत झालेल्या फोनवरील संभाषणावरुन आलोसे बोराटे यांनी तक्रारदार भगत यांना लाच रक्कम घेऊन जय भवानी विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता इंदापुर येथे बोलाविले असल्याचे निष्पन्न झालेने सापळा कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले. त्या अनुशंगाने तक्रारदार, पंच, सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर दि. 08/04/2026 रोजीच्या सापळा परत कारवाईनंतर तक्रारदार यांचेकडुन माझे ताब्यात सुरक्षीतरित्या ठेवलेल्या लाच रकमेचे पाकिट पंचांसमक्ष हजर करुन सदरचे पाकिट सपोफौ चव्हाण यांचे ताब्यात दिले. सपोफौ चव्हाण यांनी सदरच्या पाकिटामधील रक्कम हि दि. 08/04/2026 रोजीच्या सापळा परत कारवाई दरम्यान वापरलेली रक्कम असल्याची पंचांची खात्री करुन दिली. तसेच दि. 08/04/2026 रोजी सापळा पुर्व कारवाईमध्ये लाचेकामी वापरण्यात येणा-या रक्कमेच्या चलनी नोटांचे नंबर एका को-या कागदावर पंच क्र.2 श्री पास्ते यांचे मदतीने लिहून घेण्यात आले होते तो कागद मी पंचांसमक्ष हजर केला. सदर कागदावरील लिहीलेले नोटांचे क्रमांक व सपोफ‍ौ चव्हाण यांचे ताब्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची पंचांची खात्री करुन देण्यात आली.सदर नोटानां स पो फौ चव्हाण यांनी अँथ्रासिन पावडर लावुन प्रात्याक्षिक करुन दाखवले. व अन्थ्रासीन पावडर लावले लाच रक्कम तक्रारदार श्री. भगत यांच्या शर्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर

आम्ही पंच, तक्रारदार व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईचे अनुशंगाने योग्य त्या सूचना दिल्या. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार यांना 11.56 वा. लावला व तक्रारदार व पंच क्र.1 यांना त्यांचे दुचाकी वाहन क्रं एमएच 42 एव्ही 9909 यावरुन जय भवानी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता इंदापुरच्या दिशेने रवाना केले व त्यामागुन मी, सापळा पथक व पंच क्र 2 हे तक्ररदार यांचे मागे जावुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने जय भवानी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता इंदापुर, पुणे येथे सापळा लावुन थांबले. काही वेळाने तक्रारदार यांनी त्यांना दिलेल्या सुचनेप्रमाणे लाच रक्कम स्वीकारले बाबतचा पुर्वनियोजीत ईशारा केला. त्यावेळी पोशि ठाकुर यांनी तात्काळ तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ दुपारी 12.19 वा ची होती. त्यावेळी पो.अंम. दिवेकर यांनी लगेच व्हिडीओ चित्रीकरण सुरु केले. त्यावेळी मी पंच क्रं 1 यांना लाच रक्कम कोणी स्विकारली अशी विचारणा केली असता, पंच क्रं 1 दिपके हे आम्हास नमुद सोसायटीचे पहिल्या मजल्यावरील कार्यालयात घेऊन गेले व कार्यालयात बसलेल्या इसमाकडे इशारा करत ते लोकसेवक बोराटे असल्याचे सांगुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पँटच्या मागील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली असल्याचे सांगीतले. त्यावेळी पो.अंम. ठाकुर यांनी लगेच लोकसेवक बोराटे यांना ताब्यात घेतले. त्यावेळी मी लोकसेवकबोराटे यांना त्यांची ओळख सांगुन त्यांचेवर झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली व लोकसेवक बोराटे यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता - त्यांनी त्यांचे नाव श्री. नाना चंद्रकांत बोराटे, वय – 43 वर्षे, पद - सचिव, जय भवानी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे रा. मु. गोखळी, गॅस गोडाऊन समोर, पो. इंदापुर, जि. पुणे असे सांगितले. त्यावेळी मी आलोसे बोराटे यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे उजव्या हाताने त्यांच्या पँटच्या मागील बाजुच्या उजव्या खिशातुन लाच रक्कम काढुन टेबलवर ठेवली. त्यावेळी माझे सुचनेवरुन पंच क्रं 2 पास्ते यांनी सदरची लाच रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर आलोसे श्री. बोराटे यांचे ताब्यातील नोटांचे नंबर हे सापळापुर्व कार्यवाही दरम्यान मी यांचे ताब्यात असलेल्या नोटांचे नंबर लिहलेला कागदावरील नंबर व आलोसे बोराटे यांचेकडून हस्तगत केलेल्या लाच रकमेतील नोटांचे नंबर हे एकच असल्याचे खात्री करण्यात आली. त्यानंतर जय भवानी सोसायटीच्या कार्यालयामध्ये कृत्रिम अंधार करुन आलोसे श्री. बोराटे यांचे दोन्ही हात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे तळहातावर तसेच बोटाचे पे-यांवर अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. लोकसेवकाकडून हस्तगत केलेले लाचरक्कमेतील नोटांवर देखील अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. तसेच लोकसेवक श्री. बोराटे यांनी लाच रक्कम ठेवलेल्या पँटच्या मागील बाजुच्या उजव्या खिशास आतील बाजुस व तोंडावर देखील अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. पंच क्र. 2 श्री. पास्ते यांनी लाच रक्कमेमधील नोटांचे नंबर तपासल्याने त्यांचे देखील दोन्ही हाताचे पुढील बाजुस आणि बोटांचे पे-यांवर अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तसेच तक्रारदार यांचे उजव्या हातावर आणि बोटांचे पे-यास, शर्टचे पुढील बाजुचे डाव्या खिशाचे आतील बाजुस व कडांवर अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर ठिकाणी पुन्हा उजेड करण्यात आला. त्यावेळी मी तक्रारदार यांना सोसायटीच्या चेअरमन बाबत विचारणा केली असता, त्यांनी संचालक मंडळ बरखास्त केलेले असुन सदयस्थितीमध्ये प्रशासक म्हणुन नंदकुमार गोविंद माने, बँक इन्सपेक्टर, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक, वडापुरी शाखा, ता, इंदापुर हे असल्याचे सांगीतले त्यांना व सह निंबधक ता इंदापुर यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधुन झाले कारवाईबाबत माहिती दिली व झाले कारवाईच्या अनुशंगाने माहिती देणेकरीता इंदापुर पोलीस स्टेशन येथे येणेबाबत कळविले. त्यानंतर मी तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुशंगाने त्यांचे पिक कर्जाचे कागदपत्राबाबत आलोसे बोराटे यांना माहिती विचारली असता, त्यांनी तक्रारदार भगत यांना वाटप केलेल्या पिक कर्जाच्या वाटपाची यादी पथकासमक्ष हजर केली असुन सदरची यादी मी ताब्यात घेतली. त्यानंतर पुढील कारवाई हि इंदापुर पोलीस स्टेशन येथे जावुन करण्याचे ठरविल्याने संपुर्ण पथक, आम्ही पंच आलोसे बोराटे यांना ताब्यात घेऊन इंदापुर पोलीस स्टेशन येथे येवुन पुढील कारवाई करण्यात आली.तक्रारदार श्री. भगत यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंचासमक्ष सांगितले की, मी व पंच 1 दिपके असे माझ्या दुचाकी वाहनावरुन जय भवानी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी सोसायटीचे सचिव बोराटे साहेब व सोसायटीचे माजी चेअरमन नलवडे उपस्थित होते. त्यावेळी बोराटे साहेब यांनी मला हाताच्या ईशा-याने खाली जाण्यास सांगुन "चला" असे म्हणाले. त्यावेळी मी व पंच असे सोसायटीच्या खाली येऊन थांबलो त्यावेळी लागलीच आमच्या मागोमाग नाना बोराटे आले. मी त्यांना "पिक कर्जाचं वेळेत वाटप केल्याबद्दल धन्यवाद, सहकार्य राहुदया, तुम्ही म्हणल्या प्रमाणे हे हजार येत" असे म्हणत माझ्या उजव्या हाताने माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम काढुन सचिव बोराटे यांचेसमोर धरली असता, त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने लाच रक्कम स्विकारुन त्यांचे पँटच्या मागील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवत असताना श्री बोराटे मला पंचांकडे ईशारा करत

"हयांना घेऊनच फिरताय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "त्यांना कुठं बसवायचं एकटयांला म्हणुन आलोय घेऊन
चला येऊ का म.." असे म्हणत असताना पुढे येवुन दिलेल्या सुचनेप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याच्या पुर्वनियोजीत
ईशारा केला. त्यावेळी पथकाने येऊन सचिव बोराटे यांना ताब्यात घेतले. अशी हकिकत आम्हा दोन्ही पंचांसमक्ष
सांगीतली.त्यानंतर मी पंच क्रं 1 दिपके यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत हकिकत विचारली
असता, त्यांनीही तक्रारदार यांनी सांगीतल्या प्रमाणेच हकिकत सांगीतली. त्यानंतर मी सापळा कारवाई दरम्यानचे
व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता, त्यामध्ये तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी
सांगीतलेप्रमाणे संभाषण मिळुन आले. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक श्री. नाना चंद्रकांत बोराटे, वय - 43 वर्षे, पद - सचिव, जय भवानी विविध कार्यकारी सेवा
सहकारी सोसायटी, पंधरवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे रा. मु. गोखळी, गॅस गोडाऊन समोर, पो. इंदापुर, जि. पुणे
यांनी तक्रारदार यांचे जमिनीवर काढण्यात आलेल्या पीक कर्ज मंजुर केलेचा मोबदला म्हणुन म्हणुन 2,000/रू लाच
रकमेची मागणी करून दिनाक 08/04/2026 रोजीचे पडताळणी दरम्यान पंचासमक्ष तडजोडीअंती 1,000/रू
लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे कबूल केले व दिंनाक 09/04/2026 रोजी जय भवानी विविध कार्यकारी
सेवा सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे येथे पंचासमक्ष 1,000/रूपये लाच रक्कम स्वीकारली
म्हणुन लोकसेवक श्री. नाना चंद्रकांत बोराटे, वय - 43 वर्षे, पद - सचिव, जय भवानी विविध कार्यकारी सेवा
सहकारी सोसायटी, पंधारवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांचे
जमिनीवर पिक कर्ज मंजुर करुन दिल्याचा मोबदला म्हणुन 1,000/रू लाच रक्कम स्वीकारली आहे म्हणून माझी
श्री. नाना चंद्रकांत बोराटे, वय - 43 वर्षे, पद - सचिव, जय भवानी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी,
पंधारवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे
कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन
बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): vilas kisanrao nale(I (Inspector)) / API

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **No.**(क्र.): **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): **or** (किंवा)

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका

**Name** (नाव): [illegible]rao nale
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API